# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे.

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**<u>प्रेसनोट</u> क्र ३६३** दिनांक: २९.१२.२०२१.

## अवैध अग्निशस्त्रे विक्रीसाठी घेवून आलेल्या इसमास ४ गावठी पिस्टल व ०६ जिवंत काडतुसांसह अटक.

---

दिनांक २५.१२.२०२१ रोजी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अंमलदार श्री मनोहर तावरे यांना गुप्त बातमीदाराचे मार्फतीने बातमी मिळाली की, नागपुर येथे राहणारा एक इसम घोडबंदर रोड येथील दिल्ली दरबार हॉटेलचे समोर गावठी पिस्टल विक्री करण्यासाठी आणनार आहे. सदरबाबत गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना बातमीचा आशय सांगुन त्यांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे सपोनिरी/नितीन बेन्द्रे, पोहवा/मनोहर तावरे, सुरेश राणे, पोना/प्रविणराज पवार, पोअं/संग्राम गायकवाड, सुशील पवार यांचे पथकाने सदर ठिकाणी सापळा रचुन शिताफिने संशईत इसम नामे परमानंद रमेश मातरे, वय. २३ वर्ष, रा. गल्ली नं. ९, संत तुकडोजी नगर, सुभाष नगर, नागपुर यास ताब्यात घेतले. सदर संशईताकडे प्राथमिक विचारपूस केली असता तो उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याचे निदर्शनास आल्याने त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात देशी बनावटीचे ०२ पिस्टल मॅग्झीनसह व ०६ जिवंत काडतुसे मिळुन आले. त्याबाबत आरोपी नामे परमानंद रमेश मातरे याचेविरुध्द काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं I ८८७/२०२१ भा.ह.का.क- ३/ २५ (१) (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाच्या पुढील तपासादरम्यान मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने सदर आरोपीकडे अधिक कौशल्यपुर्ण तपास करून आरोपीकडून प्राप्त माहीतीचे आधारे ग्राम मडगांव, ता. शेंधवा, जि. बिडवानी राज्य-मध्यप्रदेश या ठिकाणी जावून तेथून आणखी ०२ देशी बनावटीचे पिस्टल हस्तगत केलेले आहेत. अश्याप्रकारे आरोपी परमानंद रमेश मातरे याचेकडुन ०४ देशी बनावटीचे पिस्टल मॅग्झीनसह व ०६ जिवंत काडतुसे असा एकुण १,३०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास सपोनि नितीन बेंद्रे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राहुल राख, सपोनि. श्री नितीन बेन्द्रे, पोहवा/मनोहर तावरे, सुरेश राणे, पोना/ प्रविणराज पवार, पोअं/गायकवाड, पोअं. सुशील पवार यांनी केलेली आहे.




------ oooo ------